My computer/D/all file//[illegible]/letter doc

वाचले :-

१) आदेश क्र. प्रशा/२/कावि/२८/२०१३ दि. १८/१०/२०१३

२) आदेश क्र. लेखा/कावि/४१४/५०७७/२०१८ दि. २३/४/२०१८

३) प्रशासन अधिकारी माहिती व जनसंपर्क विभाग यांचे पत्र क्र.माजसं/१/कावि/२०८/१८ दि.२७/४/१८

४) आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. वैद्य/१/कावि/५००/२०१८ दि.२६/४/२०१८

५) अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.दूरसंचार/३४२/२०१८ दि.७/५/२०१८

६) सहा.आयुक्त नागरवस्ती विकास योजना विभाग यांचे पत्र क्र.नावियो/१/कावि/३२६/२०१८ दि.८/५/२०१८

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११०१८ लेखा विभाग
क्र. लेखा/१अ/कावि/६६७/२०१८
दि. १४/०६/२०१८

विषय :-आहरण व वितरण अधिकारी निश्चिती बाबत..

दुरुस्ती आदेश,

उपरोक्त वाचले क्र.२ वरील आदेशान्वये आहरण व संवितरण अधिकारी निश्चितीचा आदेश निर्गत करण्यात आला आहे. उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये खालील प्रमाणे दुरूस्ती करण्याबाबत विनंती केली आहे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी वाचले क्र. ४ च्या पत्रान्वये पशुवैद्यकीय विभाग व निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालय या विभागाचे कामकाजाकडील आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन "प्रशासन अधिकारी, वैद्यकीय मुख्य कार्यालय" यांना घोषित करण्याबाबत विनंती केली आहे. तथापि, पशुवैद्यकीय व निसर्ग कवी बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालय हे स्वतंत्र उपविभाग असल्याने त्या विभागांचे आहरण संवितरण अधिकारी म्हणून पशुवैद्यकीय अधिकारी यांनाच अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

संगणक विभागाचे नाव माहिती व तंत्रज्ञान विभाग असे बदलले आहे तसेच कार्यशाळा विभागाचे पुर्ण नाव वाहन दुरुस्ती कार्यशाळा असे नमूद करणे आवश्यक असल्याने सदर दुरुस्त्या देखील करणे आवश्यक आहे.

सबब, मी आयुक्त , पिंपरी चिंचवड महानगरपालिका उपरोक्त वाचले क्र.२ मधील आदेशात वाचले क्र.३,५ व ६ वरील पत्रान्वये विभागांचे मागणीनुसार खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देत आहे.

| दिनांक २३/४/२०१८ च्या आदेशातील अनुक्रमांक | दि. २३/४/२०१८ च्या आदेशातील मजकूर | दुरस्ती करावयाचा मजकूर |
|---|---|---|
| ३६ | आहरण व संवितरण अधिकारी - माहिती व जनसंपर्क अधिकारी | आहरण व संवितरण अधिकारी - प्रशासन अधिकारी, माहिती व जनसंपर्क विभाग |
| ४ | विभागाचे नाव – संगणक | विभागाचे नाव – माहिती व तंत्रज्ञान विभाग |
| ३१ | विभागाचे नाव – कार्यशाळा | विभागाचे नाव – वाहन दुरुस्ती कार्यशाळा विभाग |
| | आहरण व संवितरण अधिकारी -कार्यकारी अभियंता (कार्यशाळा) | आहरण व संवितरण अधिकारी- कार्यकारी अभियंता (वाहन दुरुस्ती कार्यशाळा) |
| ४० | आहरण व संवितरण अधिकारी- समाज विकास अधिकारी | आहरण व संवितरण अधिकारी- सहा.आयुक्त (नागरवस्ती विकास योजना विभाग) |
| २५ | दूरसंचार विभाग<br>आहरण व संवितरण अधिकारी- उपअभियंता | आहरण व संवितरण अधिकारी- वायरलेस इनचार्ज |

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रति,

१) संबंधित आहरण व वितरण अधिकारी

प्रत-

१) महानगरपालिकेच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी